**महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या नियामक मंडळाची पहिली बैठक दि. २९.३.९६ रोजी मंत्रालयातील ५ वा मजल्यावरील समिती सभागृहामध्ये झाली. सदरील बैठकीत खालील ठरावांना मंजूरी देण्यात आली.**

ठराव क्र.१/१

'ठराव करण्यात येतो की, महामंडळाने शासनाकडून निधी मिळवून मिळालेली रक्कम खर्च करण्याचे, त्यासाठी बँकेमध्ये खाती उघडण्याची व चालविण्याची व्यवस्था करण्याचे अधिकार कार्यकारी संचालक यांना प्रदान करण्यात येत आहेत.'

ठराव क्र.१/२

'ठराव करण्यात येतो की, महामंडळाचा कारभार विहीत नियमावली करून त्यास मंजूरी मिळेपर्यंत कालावधीमध्ये पाटबंधारे विभागाच्या प्रचलित नियमानुसार आवश्यक ते फेरफार करून महामंडळाचा कार्यभार चालविण्यास मंजूरी देण्यात येत आहे.'

ठराव क्र.१/३

'ठराव करण्यात येतो की, महामंडळाच्या कार्यालयासाठी २७ पदे तात्पुरत्या स्वरुपात निर्माण करण्यास व ती पाटबंधारे विभागातील / महाराष्ट्र भूविकास महामंडळातील योग्य कर्मचाऱ्यांमधून प्रतिनियुक्ती भत्त्याविना अटीवर भरण्यास मंजूरी देण्यात येत आहे. भूविकास महामंडळातील योग्य कर्मचाऱ्यांना सध्याच्या वेतनावर घेण्यास मंजूरी आहे.'

ठराव क्र.१/४

'ठराव करण्यात येतो की, महामंडळाच्या लेखा परिक्षणासाठी निवासी लेखाधिकाऱ्याची व्यवस्था कार्यान्वित करण्यासाठी तत्वतः मंजूरी देण्यात येत आहे.'

ठराव क्र.१/५

'ठराव करण्यात येतो की, कार्यकारी संचालकांना मा.अध्यक्षांचे संमतीने महामंडळासाठी निधी उभारणीसाठी अशा प्रकारच्या निमशासकीय उपक्रमांसाठी मोठ्या प्रमाणावर वित्तीय उभारणी करण्याचा प्रदीर्घ अनुभव असणाऱ्या वित्त सल्लागारांची नेमणूक करण्यास व त्या सल्लागारास अटी व शर्ती ठरवून वाजवी शुल्क अदा करण्यास अधिकार देण्यात येत आहे.'

ठराव क्र.१/६

'ठराव करण्यात येतो की, मॅनेजमेंट इन्फॉर्मेशन सिस्टीम अंमलात आणण्यासाठी आवश्यक असणाऱ्या सल्लागारांची नेमणूक करण्यासाठी जाहीर निविदा कार्यकारी संचालकांनी बोलवाव्यात व त्या अंतिम निर्णयासाठी नियामक मंडळापुढे ठेवाव्यात.'

रा गो कुलकर्णी २९.३.९६

(रा. गो. कुलकर्णी)
कार्यकारी संचालक व सदस्य सचिव,
म.कृ.खो.वि.मंडळ, पुणे

'मान्य'

मा. महादेवराव शिवणकर
मा.मंत्री (पा) व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.मंडळ, पुणे